महाराष्ट्राचा हक्काचा आवाज

दैनिक बीड लोकनेता

Lokneta News - लोकनेता न्युज

● मुख्य संपादक : ज्ञानेश्वर मुंढे ●

प्रतिनिधी नेमणूक सुरु आहे

Epaper: www.dainiklokneta.in/

दैनिक लोकनेता

दैनिक लोकनेता या दैनिकासाठी संपूर्ण महाराष्ट्राभर प्रतिनिधी नेमणूक सुरू आहे तरी इच्छुकांनी खालील इमेल किंवा नंबर वरती संपर्क साधावा. पात्र उमेदवारांना योग्य पदावर संधी देण्यात येईल.

मुख्य कार्यालय: मिरकाळा ता. गेवराई जि.बीड 7046383112

dnyaneshmofficial@gmail.com 7499615933

सोमवार दि.१८ मे २०२६ RNI-MAHMAR/2023/89402 Email : dnyaneshmofficial@gmail.com वर्ष : ०३ अंक : २७० किंमत २ रुपये 7499615933

# छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य: नगर परिषदेकडून परळीत मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा प्रदान

## आ.धनंजय मुंडे यांच्या हस्ते जागा हस्तांतरित!

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी वैजनाथ शहरात मराठा भवन उभे राहावे अशी गेल्या अनेक वर्षांपासून ची सकल मराठा समाजाची मागणी होती. ना.पंकजाताई मुंडे व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ नगरपरिषदे कडून मराठा भवनसाठी २८ गुंठे जागा देण्यात आली आहे. स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंतीचे औचित्य साधत आज माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते नामफलकाचे अनावरण करत ही जागा मराठा भवनसाठी हस्तांतरित करण्यात आली आहे. वैद्यनाथ मंदिर परिसरात नंदागौळ रस्त्यावर वेताळ मंदिराच्या बाजूला असलेली २८ गुंठे जागा नगरपरिषदेकडून मराठा भवनसाठी नियोजित करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षापासून परळी मध्ये मराठा भवन असावे अशी मराठा समाजाची आग्रही मागणी होती. आता मराठा भवनसाठी ही जागा हस्तांतरित करण्यात आली आहे.लवकरात लवकर सुसज्ज मराठा भवन उभे राहील अशी भूमिका मराठा समाज बांधवांनी व्यक्त केली. या अनुषंगाने आज संबंधित ही २८ गुंठे जागा माजी मंत्री आ .धनंजय मुंडे यांच्या हस्ते






हस्तांतरित करण्यात आली. यावेळी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन व नियोजित मराठा भवनच्या नाम फलकाचे अनावरण आ.धनंजय मुंडे, नगराध्यक्ष सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, न. प. गटनेते वैजनाथ सोळंके, नगरसेवक व्यंकटेश शिंदे, श्रीकृष्ण कराड, नितीन बागवाले, अनंत इंगळे, प्रा.शंकर कापसे, देवराव लुगडे, नितीन शिंदे, सेवकराम जाधव, उत्तम माने, उत्तम मोरे, इंजि. संजय देशमुख, राजेश ठोंबरे शिवाजी देशमुख, बाबा शिंदे, महादेव गंगणे, दिलीप माने, वैजनाथ सुरवसे, सचिन मराठे,प्रल्हाद सुरवसे, शरद चव्हाण, गिरीश भोसले, डॉक्टर प्रा.पी.एल.कराड, राजेंद्र सोनी, रमेश चौंडे, विजयकुमार खोसे ,न. प. उपमुख्य अधिकारी संतोष रोडे, नगर अभियंता ढवळे आदींसह सकल मराठा समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी परळीत देखणे मराठा भवन उभे राहील असा विश्वास मराठा समाज बांधवांनी व्यक्त केला. मराठा भवनसाठी ही जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल सकल मराठा समाजाच्या वतीने आमदार धनंजय मुंडे व नगराध्यक्ष सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. सकल मराठा समाजाच्या वतीने परळी नगर परिषदेचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

**मराठा भवन मध्ये काय आहे प्रस्तावित?...**

दरम्यान,सकल मराठा समाजाच्या वतीने परळी येथे उभारण्यात येणाऱ्या मराठा भवन मध्ये समाज उपयोगी उपक्रम राबवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुला मुलींचे वसतीगृह, शिकवणी क्लासेस, अभ्यासिका, नोकरी मार्गदर्शन केंद्र आदी विद्यार्थी कलागुण विकसित करण्यासाठीचे उपक्रम या भवन मधून राबवण्यात येणार आहेत. उद्योग, व्यवसाय मार्गदर्शन, व्यवसायातील बारकावे, येणारी आव्हाने, उद्योजक, व्यावसायिकांचे परिचय मेळावे आदी आयोजित करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर वधू-वर परिचय मेळावे, सामूहिक विवाह कार्य, शिक्षण, आरोग्य, कौटुंबिक, सामाजिक ,व्यावसायिक यासह अनेक विषयावर प्रबोधन मार्गदर्शन मिळावे आयोजित करण्यासाठी मराठा भवन उपयुक्त ठरणार आहे. सर्व गुणसंपन्न पिढी घडविण्याच्या दृष्टिकोनातून ही वास्तू एक महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याचा संकल्प मराठा भवनच्या उभारणीत करण्यात आलेला आहे.

# पुणे-सोलापूर महामार्गाच्या उन्नत मार्गाच्या कामाआधी 'वाढीव लेन' करा ; जिल्हा नियोजन बैठकीत आमदार राहुल कुल यांची मागणी!

## पुणे जिल्ह्याचा अद्ययावत पर्यटन आराखडा तयार करा;पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या 'डीपीडीसी' बैठकीत दौंडसह ग्रामीण पुण्याच्या प्रश्नांचा धडाका

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड,पुणे (बबनराव धायतोंडे)**

पुणे-सोलापूर आणि पुणे-नगर महामार्गावर मंजूर झालेल्या उन्नत मार्गाचे (Flyover) काम प्रत्यक्ष सुरू करण्यापूर्वी,वाहतुकीची होणारी कोंडी टाळण्यासाठी रस्त्याच्या बाजूला तातडीने 'वाढीव लेन' तयार करण्यात याव्यात,अशी आग्रही आणि महत्त्वाची मागणी आमदार राहुल कुल यांनी केली. पुणे जिल्हा नियोजन समितीची महत्त्वाची बैठक राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. नामदार श्रीम.सुनेत्राताई पवार यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे संपन्न झाली.या बैठकीत आमदार राहुल कुल यांनी दौंड मतदारसंघासह संपूर्ण पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा,शेती,क्रीडा आणि दळणवळणाच्या प्रश्नांवर प्रशासनाला धारेवर धरत विविध मागण्यांचा धडाका लावला.या बैठकीत जिल्ह्याच्या अंतिम विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आली.



बैठकीत बोलताना आमदार राहुल कुल यांनी महामार्गांवरील वाहतूक कोंडीचा प्रश्न अत्यंत गंभीरतेने मांडला. पुणे-सोलापूर आणि पुणे-नगर महामार्गावर उन्नत मार्गाचे काम सुरू झाल्यावर वाहतुकीचा बोजवारा उडू नये, यासाठी प्रशासनाने आधीच नियोजन करून अतिरिक्त लेन तयार कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. तसेच ग्रामीण भागाचा कणा असलेल्या ग्रामपंचायत इमारती, स्मशानभूमी, गावांतर्गत रस्ते आणि सामाजिक सभागृहांची प्रलंबित कामे प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता तातडीने मार्गी लावावीत, असे त्यांनी ठणकावून सांगितले.

ग्रामीण भागातील दिव्यांग बांधवांसाठीचे अपंग साहित्य वाटप आणि खेळाडूंसाठीच्या क्रीडा साहित्याची खरेदी ही 'इ-निविदा' (e-Tender) प्रणालीच्या माध्यमातूनच झाली पाहिजे, जेणेकरून कामात पारदर्शकता राहील आणि दर्जेदार साहित्य वेळेत मिळेल, अशी भूमिका आमदार कुल यांनी मांडली. तसेच मंजूर झालेली सर्व विकासकामे ठरलेल्या वेळेत आणि दर्जेदार पद्धतीनेच पूर्ण झाली पाहिजेत, यात कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

पुणे जिल्ह्याला ऐतिहासिक वैभव लाभले असून, जिल्ह्याचा अद्ययावत पर्यटन आराखडा तयार करून 'किल्ले संवर्धन विशेष मोहीम' राबवावी, अशी मागणी त्यांनी केली.यासोबतच शेतकऱ्यांसाठी आणि ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी इलेक्ट्रिक पंप मंजूर करावेत,तसेच पर्यावरण रक्षणासाठी प्रस्तावित रिंग रोड,गडकिल्ले आणि अष्टविनायक महामार्गाच्या दुतर्फा व्यापक वृक्षारोपण मोहीम राबवावी,अशा विविध विषयांवर त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले.या बैठकीस जिल्ह्यातील सर्व मंत्री,खासदार, आमदार,जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, जिल्हाधिकारी आणि जिल्हा प्रशासनातील सर्व खात्यांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.आमदार कुल यांनी मांडलेल्या मुद्द्यांवर पालकमंत्र्यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले आहे.

# बजाज कृषी महाविद्यालयाच्या कृषिदूतांची रचना फार्म्स येथे अभ्यासभेट; विद्यार्थ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची ओळख




लोकनेता न्यूज नेटवर्क

**वर्धा । प्रतिनिधी**

ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रमाअंतर्गत बजाज कृषी महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील कृषिदूत विद्यार्थ्यांनी कान्होलीबारा येथील रचना ऑरगॅनिक अँड नॅचरल फार्म्स प्रा. लि. येथे शैक्षणिक अभ्यासभेट दिली.या अभ्यासभेटीदरम्यान विद्यार्थ्यांना कंपनीची कार्यपद्धती, उत्पादन प्रक्रिया, आधुनिक कृषी तंत्रज्ञान तसेच वापरात असलेल्या यंत्रणांची सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष उत्पादन क्षेत्राला भेट देत कामकाजाचा अभ्यास केला आणि कंपनीतील अधिकारी वर्गाशी संवाद साधत व्यावसायिक कौशल्यांचे ज्ञान आत्मसात केले.या भेटीसाठी आवश्यक परवानगी रचना फार्म्सच्या व्यवस्थापनाकडून घेण्यात आली होती. या संपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी हेमंत कुकडे यांनी महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

या अभ्यासभेटीत साहिल वंजारी, सुजित राठोड, प्रणव संगई, प्रतीक काळे व प्रज्वल वांदिले या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला.

हा उपक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. स्नेहल देशमुख, कार्यक्रम समन्वयक राजेंद्र खर्चे तसेच कार्यक्रम अधिकारी डॉ. कविता चोपडे व आकाश लेवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.

या भेटीतून विद्यार्थ्यांना कृषी उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव मिळाला असून, भविष्यातील करिअरसाठी दिशा मिळाल्याची भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. रचना फार्म्सच्या व्यवस्थापनानेही विद्यार्थ्यांच्या उत्साहाचे कौतुक करत, कृषी क्षेत्रात त्यांचे योगदान वाढावे यासाठी शुभेच्छा दिल्या.

# मराठा भवनाच्या जागेवरून नवा वाद;मराठा भवन समाजाच्या नावा खाली भूमाफियांचा डाव?-नागरिकांमध्ये संताप-दिपक देशमुख

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

-मराठा समाजासाठी मराठा भवन उभारण्याच्या मागणीसाठी गेल्या आठ-दहा वर्षांपासून नगरपरिषदेसमोर सातत्याने आंदोलने करण्यात आली. या आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व मराठा बांधवांचे प्रथम आभार मानले जात असतानाच, आता मराठा भवनासाठी देण्यात येणाऱ्या जागेवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. काही सामाजिक कार्यकर्ते व मराठा बांधवांनी या संपूर्ण प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, मराठा समाजाच्या भावनांचा वापर करून काही भूमाफिया व राजकीय मंडळी स्वतःचे हित साधत आहेत, असा आरोप माजी नगराध्यक्षा दिपक देशमुख यानी केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, यापूर्वी नगरपरिषदेकडून मराठा भवनासाठी इंडस्ट्रीज एरियामधील ओपन स्पेस, काळे हॉस्पिटल शेजारील जागा तसेच ब्रह्मवाडी शिवारातील सुमारे चार एकर जागा ठरावासह देण्यात आली होती. मात्र त्या जागांचा स्वीकार का करण्यात आला नाही? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. दरम्यान, आता वैद्यनाथ मंदिराच्या पाठीमागे, स्मशानभूमी लगत असलेल्या दत्त मंदिर देवस्थानच्या जमिनीबाबत कोणताही अधिकृत नगरपरिषद ठराव नसताना फक्त पत्र देऊन चतु:सीमा निश्चित करण्यात आल्याचा आरोप करण्यात येत आहे. या जागेचा सर्वे नंबर काय? तो जाहीर करावा तसेच, स्थानिक आमदारांनी घेतलेल्या बैठकीत नाथ प्रतिष्ठानने ही जागा दिली असे सांगण्यात आल्याने नवीन चर्चांना उधाण आले आहे.

काही मराठा बांधवांनी सवाल उपस्थित केला आहे की, देवस्थानची जमीन शासनाची परवानगी घेतल्याशिवाय कायदेशीररित्या हस्तांतरित किंवा विक्री करता येते का? तसेच संबंधित जागा एका नगरसेवक व भूमाफियाशी संबंधित असल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार हायवेच्या मध्यबिंदूपासून दोन्ही बाजूंना ७५ मीटरपर्यंत कोणतेही बांधकाम करता येत नाही. त्यामुळे संबंधित जागेवर भविष्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ही अडचणीची जागा नाथ प्रतिष्ठानमार्फत मराठा समाजाच्या गळ्यात मारण्याचा प्रयत्न सुरू असून, त्यामागे राजकीय वर्चस्व वाढवण्याचा हेतू आहे, असा आरोप माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख याच्याकडून करण्यात आला.आंदोलन नगरपरिषदेकडे जागा मागण्यासाठी झाले होते, मग ओपन स्पेस न देता नाथ प्रतिष्ठानची जागा पुढे का आणली जात आहे? असा सवाल उपस्थित करत काही मराठा बांधवांनी समाजाने जागृत भूमिका घेण्याचे आवाहन केले आहे.या संपूर्ण प्रकरणामुळे परळीतील राजकीय व सामाजिक वातावरण तापले असून, आगामी काळात हा वाद आणखी चिघळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



# बाप्या-एक धाडशी विषय

लोकनेता न्यूज नेटवर्क

कुणाल साळुंके, चित्रपट समीक्षक/ फिल्म क्रिटीक

मराठी चित्रपटांमधून नेहमीच काही धाडशी विषयांवर प्रकाश पडला जातो. लिंग बदल हा संवेदनशील विषय घेऊन नुकताच समीर तिवारी दिग्दर्शित ' बाप्या' हा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला आहे.

कोकणातील एका सामान्य कुटुंबातील हे कथानक आहे.लिंगबदल आणि अस्मितेची गुंतागुंत याची सुरेख मांडणी चित्रपटात बघायला मिळते. हा सामाजिक विषय हाताळण्यासाठी निर्मात्याचे आणि दिग्दर्शकाचे कौतुक करावेसे वाटते. हा चित्रपट भावना, संवेदना,मिश्किल विनोद, सहानुभूती यांचं एकत्रीत मिश्रण प्रेक्षकांना मेजवानी ठरले आहे.

कथा ही शैलजा थोडक्यात शैलजा ते शैलेश (राजश्री देशपांडे ) या पत्नी आणि आई आहे, जिला स्वतःची खरी ओळख पटते आणि ती शैलेश बनण्यासाठी लिंगबदल शस्त्रक्रिया करून आपल्या गावी पुरुष रूपात येते. या निर्णयानंतरच्या परिणामांवर विशेषतः कुटुंबात येणाऱ्या अडचणी, तिच्या या परिवर्तनाचा तिचा पती अन्या (गिरीश कुलकर्णी) आणि त्यांचा किशोरवयीन मुलगा संज्या (आर्यन मेंघजी) यांच्यावर कसा परिणाम होतो, यावर कथानक लक्ष केंद्रित करते. आर्यन चा अभिनय बघण्यासारखा आहे. नायक गिरीश कुलकर्णी एक मद्यपी पती असून त्याचा अभिनय नेहमीप्रमाणे नैसर्गिक वाटतो. ही कथा भावनिक तर आहेच पण एक धाडसी आणि अपारंपरिक सुद्धा आहे. हा विषय हाताळण्यासाठी विनोदाचा परफेक्ट टायमिंग साधून हलके फुलके पण हसवून सोडणाऱ्या विनोदांमुळे चित्रपट बघावासा वाटतो. कोकणातील मनमोहक गावाकडचे प्रसंग छायाचित्रकाराने मस्त टिपले आहेत. राजश्री देशपांडे एका संभ्रमात असलेली स्त्री असून पुढे लिंगबदलामुळे कणखर व्यक्ती बनते.एकच पडद्यावर दोन पात्रांचा अभिनय तिला आपल्या अस्सल आणि प्रभावी अभिनयासाठी समीक्षकांची दाद मिळून देते. पात्राची सूक्ष्मता तिने ओळखली आहे.नायकाला बसलेला धक्का, नकार आणि पूर्वग्रहांपासून ते अखेरचा स्वीकार आणि मैत्रीपर्यंतचा प्रवास अभिनयातून सुंदरपणे मांडला आहे.देविका दफ्तरदार यांचा छान अभिनय आहे.इतर सर्व कलाकारांनी मेहनत घेतली आहे.

दिग्दर्शन समीर तिवारी यांनी हा विषय मोठ्या मनाने हाताळला आहे. चित्रपटाचे कथानक सुसंगत आणि अविस्मरणीय दाखवण्याचा प्रयत्न यशस्वी झाला.कुठेही अश्लीलता व कंटाळवाणेपणा येऊ दिलेला नाहीय. तांत्रिक गोष्टींबद्दल सांगायचे तर चित्रपट दृश्यात्मकदृष्ट्या (खास करून विविध अंगाने घेतलेले कोकणातले सीन ) तेजस्वी, सुस्पष्ट आहे आणि यात जोएल क्रास्टो यांचे उत्साहवर्धक पार्श्वसंगीत व गाणी आहेत, जी भावनिकदृष्ट्या भारलेल्या दृश्यांना अधिक प्रभावी करतात.उत्तरार्धात काही उपकथा जोडल्यामुळे चित्रपट थोडा स्लो झाल्यासारखा वाटतो.

थोडक्यात 'बाप्या' हा चित्रपट पुरुषत्व, स्त्रीत्व,मित्रत्व आणि पालकत्वाच्या पारंपारिक संकल्पनांवर मार्मिक प्रश्न विचारतो. ही एक धाडसी, सुंदर आणि हृदयद्रावक कथा आहे, जी प्रेम आणि बिनशर्त स्वीकृतीची, निस्वार्थाची नव्याने व्याख्या करते. या चित्रपटाला फिल्म फेस्टिवल मध्ये पारितोषिके मिळाली आहेत.अनोख्या तसेच अर्थपूर्ण आणि वास्तववादी सिनेमाच्या शोधात असलेल्या रसिकांसाठी हा चित्रपट आवर्जून पाहण्यासारखा आहे.

चित्रपटाला ३.५ स्टार...




# पिपंळगाव फाटा येथील रनजीत रितेश राठोड ला दहावीत मिळाले सर्व विषयात ३५% टक्केच?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पिपंळगाव । डॉ.भारत उद्धव राठोड**

दहावीच्या निकालात कोणाला किती जास्त टक्के पडाले , याची चर्चा सर्व्हि कडे सुरू असतानाच पिपंळगाव फाटा येथील एका विद्यार्थ्याने मात्र आपल्या आगळ्यावेगळ्या निकालाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. रनजीत रितेश राठोड याने दहावीच्या सर्व सहा विषयांत प्रत्येकी ३५ गुण मिळवत चक्क 'काटावर' पास होण्याचा योगायोग साधला आहे. पळशी तांडा येथील सुमन सुधाकरराव नाईक विद्यालया चा विद्यार्थी असून जेव्हा त्याचे आई वडील गुणपत्रिका पाहिली, तेव्हा त्या चक झाले आणि त्याच्या मित्रांना आश्चर्याचा धक्का बसला. त्याला मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान आणि समाजशास्त्र या सहाही विषयांत प्रत्येकी ३५% गुण मिळाले आहेत. त्याला एकूण ५०० पैकी १७५ गुण मिळाले असून ही टक्केवारी ही ३५ एवढीच आहे. कोणत्याही विषयात एकही गुण कमी नाही की जास्त नाही, अशा या 'छान' निकालामुळे रनजीत सध्या मांडवी परिसरात चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे...



# आय.पी.एस.अधिकारी तेजस्वीनी सातपुते यांच्यावर मोठी जबाबदारी पुणे गुन्हे शाखेच्या अप्पर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती; पाथर्डी तालुक्यातील साकेगाव मूळनिवासी असल्यामुळे गावासह तालुक्या मधून शुभेच्छांचा वर्षाव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाथर्डी । लक्ष्मण डांगे**

पाथर्डी तालुक्यातील साकेगाव येथील मूळ निवासी कन्या तेजस्वीनी सातपुते यांच्यावर राज्यातील महत्त्वाची जबाबदारी पुणे गुन्हे शाखेच्या अप्पर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती

झाल्यामुळे साकेगाव तसेच पाथर्डी व शेवगाव तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणारी अभिमानास्पद बाब म्हणजे मूळ गाव साकेगाव येथील कन्या तथा कर्तबगार महिला आयपीएस अधिकारी तेजस्वीनी सातपुते यांची पुणे शहर गुन्हे शाखेच्या अप्पर पोलीस आयुक्तपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या पदोन्नतीमुळे साकेगाव या गावाला पुन्हा एकदा राज्यभरात मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.



विशेष म्हणजे, राज्यभर चर्चेत असलेल्या भोंदू खरात प्रकरणातील विशेष तपास पथकाची (SIT) जबाबदारीही सातपुते यांच्याकडे कायम ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. त्यांच्या धाडसी, शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख कार्यशैलीवर शासनाने दाखवलेला हा विश्वास मानला जात आहे.

तेजस्वीनी सातपुते यांनी सोलापूर जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असताना कायदा व सुव्यवस्था राखत अनेक उल्लेखनीय उपक्रम राबवले. सातारा जिल्ह्यातील पोलीस अधीक्षकपदाच्या कार्यकाळातही त्यांनी गुन्हेगारीविरोधात कठोर भूमिका घेत प्रभावी कामगिरी बजावली. मुंबईतील जबाबदाऱ्यांमध्येही त्यांनी आपल्या सक्षम नेतृत्वाची छाप सोडली होती.

तेजस्विनी सातपुते या महिला अधिकारी असूनही त्यांच्या यां उत्कृष्ट आणि धडाडीच्या कार्याचा आणि त्यांच्या कार्यपद्धतीचा आलेख पाहता त्याची दखल घेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भोंदू अशोक खरात प्रकरणाच्या एसआयटी तपासाची प्रमुखपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी ही त्यांच्यावर सोपवली होती.. त्यांच्या नेतृत्व आणि निडर कार्यामुळे तपास प्रक्रियेला अधिक चलना मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

तेजस्वीनी सातपुते यांच्या या यशस्वी वाटचालीमुळे पाथर्डी व शेवगावसह जिल्ह्याची मान उंचावली असून, तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या यशाने ग्रामीण भागातील तरुणवर्गासह नवयुवती यांनाही नवे मार्गदर्शक प्रेरणास्थान मिळाले आहे.


# घोटी फाटा-कमठाला दरम्यान महामार्ग उखडला


लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**

हिमायतनगर ते किनवट माहूर या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (ए) वर चिखली फाटा व गोकुळ नगर दरम्यान

आणि घोटी फाटा ते कमठालादरम्यान महामार्गाची दुरवस्था झाली असून, रस्त्यावर तडे व खड्डे पडल्याने दुचाकी अपघातांची मालिका सुरू झाली आहे. अपघातांमध्ये वाहनचालकांना हात, पाय, डोके व कमरेला गंभीर दुखापती होत आहे.





महामार्गाच्या मधोमध सिमेंट काँक्रीट उखडल्याने दिवसा तसेच रात्री वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही. परिणामी दररोज चार ते पाच अपघात होत असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. विशेषतः दुचाकीस्वारांना धोका निर्माण झाला आहे. या संदर्भात शेतकऱ्यांनी सांगितले की, दररोज अपघात होत आहेत. अनेकांचे हात-पाय फॅक्चर होतात, तर काहींना डोक्याला गंभीर दुखापत होते.

याशिवाय रोहिदास तांड्याजवळही महामार्गाला भेगा पडल्या आहेत. मात्र, वारंवार अपघात होत असूनही राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. एखाद्या वाहनचालकाचा जीव गेल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा सवाल नागरिक करत आहेत.

# धनदांडग्यांना,पुढा-यांना पायघड्या मात्र गोरगरिबांना कायद्याचा दंडुका! नगरपालिकेच्या दुटप्पीपणा निषेधार्ह-डॉ.गणेश ढवळे

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

बीड शहरातील बसस्थानक, जिल्हा रुग्णालय परिसरातील रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टपऱ्या, फेरीवाले व लघुउद्योजकांच्या दुकानांवर अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली कारवाई करत नगरपालिकेने कायद्याचा धाक दाखवला. मात्र दुसरीकडे शहरातील मोठमोठ्या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.नगरपालिकेने गोरगरीबांच्या उपजीविकेवर हातोडा चालवत स्वतःची पाठ थोपटून घेतली असली, तरी बिंदुसरा व करपरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकामे, मोठमोठे मंगल कार्यालये, हॉटेल्स आणि भू-माफियांनी केलेल्या नियमबाह्य बांधकामांवर मात्र कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.शहरातील अनेक भागांमध्ये नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांविरोधात सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांनी वारंवार आंदोलने आणि निवेदने दिली आहेत. मात्र नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे. आर्थिक साटेलोटे आणि राजकीय दबावामुळेच मोठ्या अतिक्रमणधारकांना अभय दिले जात असल्याचा आरोपही होत आहे.कायदा सर्वांसाठी समान असावा. गोरगरीबांवर कारवाई आणि धनदांडग्यांना पायघड्या हा प्रकार थांबला पाहिजे. अतिक्रमण हटाव मोहिमेत दुजाभाव न करता सर्वांवर समान निकष लावले गेले पाहिजेत, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.



# शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन कोठावळे यांचा नेत्ररोगतज्ञ पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांच्या हस्ते गौरव

## दैनिक लोकनेताच्या राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्काराने डॉ.चंद्रसेन कोठावळे सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाचोड । त्रिसिंग जायभाये**

दि.१७ :येथील शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांना नुकताच राज्यस्तरीय आदर्श प्राचार्य पुरस्कार जगप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ पद्मश्री डॉ . तात्याराव लहाने यांच्या शुभहस्ते प्रदान करून गौरविण्यात आले. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, विद्यार्थीकेंद्री उपक्रम, सामाजिक बांधिलकी तसेच प्रभावी प्रशासकीय कार्यपद्धती याची दखल घेत दैनिक दैनिक लोकनेता च्या वर्धापन दिनानिमित्त भागवत पॅलेस परळी येथे आयोजित विशेष कार्यक्रमात हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या भव्य कार्यक्रमाला जीव्हीटी संस्थेचे संस्थापक मयंक गांधी, बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे तसेच सावित्रीफेम प्रसिद्ध अभिनेत्री मेघना झुझुम, नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी, पोलीस निरीक्षक नाचनसाहेब, लोकनेताचे मुख्य संपादक ज्ञानेश्वर मुंढे, त्रिसींग जायभाये यांची प्रमुख उपस्थिती होती.




मान्यवरांनी आपल्या मनोगतातून शिक्षण क्षेत्रातील गुणवंत व्यक्तींचा गौरव होणे ही काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले.प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी गेल्या एक्केचाळीस वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी करिअर मार्गदर्शन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सामाजिक जनजागृती उपक्रम, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण तसेच ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न केल्यामुळे त्यांची एक अभ्यासू आणि विद्यार्थीप्रिय प्राचार्य म्हणून ओळख निर्माण झाली आहे.त्यांच्या नेतृत्वाखाली शिवछत्रपती महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपणारे अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले आहेत. महाविद्यालयातील शिस्त, गुणवत्तापूर्ण शिक्षण, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि समाजाभिमुख उपक्रमांमुळे महाविद्यालयाची स्वतंत्र ओळख निर्माण झाली आहे.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल छत्रपती संभाजीनगरचे लोकप्रिय खासदार तथा श्री ज्ञानेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे सचिव संदीपान पाटील भुमरे, संस्था अध्यक्ष राजू नाना पाटील भुमरे, पैठणचे आमदार विलास बापू भुमरे, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य शिवराज भैय्या भुमरे तसेच विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील शुभचिंतक मान्यवरांनी प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांचे अभिनंदन केले आहे. राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित झाल्यानंतर पाचोडसह संपूर्ण परिसरातून प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून विद्यार्थी, पालक, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांकडून त्यांचे विशेष कौतुक करण्यात येत आहे. त्यांच्या या यशामुळे पाचोड परिसराच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाचे आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.

## कुरुक्षेत्रात अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय कार्यसमितीची बैठक संपन्न

# TET संदर्भातील याचिकेवर १३ मे रोजी सुनावणी,८ वा वेतन आयोगासमोर 'त्रिसूत्री' मांडणार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**संजय यलमवाड । मुखेड**

अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या राष्ट्रीय कार्यसमितीची महत्त्वपूर्ण बैठक दि. ९ मे रोजी हरियाणातील कुरुक्षेत्र येथील जाट धर्मशाळा सभागृहात राष्ट्रीय अध्यक्ष बसवराज गुरीकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. हरियाणा राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष तरूण सुहाग यांनी प्रास्ताविक केले. यावेळी विविध राज्यांतील प्रतिनिधींचा हरियाणा राज्य संघाच्या वतीने स्वागत व सत्कार करण्यात आला.



**TET संदर्भात १३ मे रोजी सुनावणी**

राष्ट्रीय सरचिटणीस कमलाकांत त्रिपाठी यांनी सांगितले की, ढएढ संदर्भात पुनर्विचार याचिका दाखल करणारी अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ ही देशातील पहिली शिक्षक संघटना आहे. सर्वोच्च न्यायालयाने सदर याचिका स्वीकारली असून दि. १३ मे रोजी ओपन कोर्टात सुनावणी होणार आहे. २०११ पूर्वी नियुक्त शिक्षकांना ढएढमधून दिलासा मिळेल, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. पदोन्नतीसाठी ढएढ सक्तीची राहू शकते, मात्र संघाचे वकील सक्षमपणे बाजू मांडतील असेही ते म्हणाले.

**८वा वेतन आयोग : 'त्रिसूत्री'चा मसुदा सादर करणार**

गेल्या दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण आंदोलन व पाठपुराव्याला यश येऊन मा. न्यायमूर्ती रंजना प्रकाश देसाई (माजी न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय) यांच्या अध्यक्षतेखाली ८वा वेतन आयोग स्थापन झाला आहे. अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाच्या वतीने एक देश-एक पेन्शन, एक देश-एक शिक्षण आणि एक देश-शिक्षकांना समान वेतन या त्रिसूत्रीच्या मागण्या वेतन आयोगासमोर मांडण्यात येणार आहेत. पुढील आठवड्यात विस्तृत मसुदा आयोगाला सादर करण्यात येणार आहे.

**नवीन शैक्षणिक धोरण व 'स्कूल कॉम्प्लेक्स'ला विरोध**

बैठकीत 'स्कूल कॉम्प्लेक्स' संकल्पनेला विरोध नोंदविण्यात आला. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांवरील अशैक्षणिक कामांचा बोजा कमी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. यासाठी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**३० वे राष्ट्रीय अधिवेशन कर्नाटकात**

अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे ३० वे राष्ट्रीय अधिवेशन २०२७ मध्ये कर्नाटक राज्यात आयोजित करण्याचा निर्णय सभेत घेण्यात आला.

**महाराष्ट्राचा सहभाग**

या बैठकीसाठी महाराष्ट्रातून राष्ट्रीय कार्याध्यक्ष तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष देविदास बस्वदे यांच्या नेतृत्वाखाली राज्य सरचिटणीस कल्याण लवांडे तसेच राज्य कार्याध्यक्ष आण्णाजी आडे उपस्थित होते. भारतातील २४ राज्यांतील प्रतिनिधींनी या बैठकीत सहभाग नोंदविला.

या संदर्भातील माहिती राज्य संयुक्त चिटणीस दिलीप देवकाबळे, राज्य उपाध्यक्ष फारुक बेग, राज्य संघटक जयवंत काळे, चंद्रकांत दामेकर, जिल्हाध्यक्ष संतोष कदम, जिल्हा चिटणीस धात्रकसर, जिल्हा कोषाध्यक्ष दिपक लोहबंदे, प्रमोद पाटील, माजी चेअरमन अशोक पवळे, अशोक पाटील मारताळेकर, सचिव हणमंत जोगपेठे, तालुकाध्यक्ष डॉ. शिवाजी कराळे, उपाध्यक्ष माधव पाटील तुपदाळकर, शिवसमर्थ पतसंस्थेचे अध्यक्ष मधूकर गायकवाड, प्रसिद्धि प्रमुख नरसिंग पाटील, सुरेश पाटील, शिवाजी काबळे यांनी दिली.

**ठळक मुद्दे**

– बैठक: दि. ९ मे, जाट धर्मशाळा, कुरुक्षेत्र (हरियाणा)
– अध्यक्ष: राष्ट्रीय अध्यक्ष बसवराज गुरीकर
– ढएढ याचिका: १३ मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी
– ८वा वेतन आयोग: 'एक देश–एक पेन्शन, शिक्षण, समान वेतन' मागणी
– राष्ट्रीय अधिवेशन: २०२७ मध्ये कर्नाटकात
– सहभाग: २४ राज्यांचे प्रतिनिधी, महाराष्ट्रातून देविदास बस्वदे यांचे नेतृत्व

## परळीतील अत्याधुनिक भाजी मंडई उभारण्यासाठी न.प.पदाधिकाऱ्यांकडून पहाणी

# सर्व सुविधांनी युक्त नव्या भाजी मंडई उभारणी कामाला नोव्हेंबरपासून प्रारंभ–बाजीराव भैय्या धर्माधिकारी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

परळी नगर परिषदेच्या गणेशपार भागातील भाजी मंडई इमारत अत्यंत जीर्ण झालेली आहे.ही जीर्ण इमारत पाडून त्या ठिकाणी ना.पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्याधुनिक व सर्व सुविधांनी युक्त नव्या भाजी मंडई इमारतीची उभारणी करण्यात येणार आहे.सर्व सुविधांनी युक्त नवीन भाजी मंडई उभारणी कामाला नोव्हेंबरपासून प्रारंभ करण्याचा प्रयत्न असुन त्यादृष्टीने पहाणी, व्यावसायिक,व्यापारी व शेतकऱ्यांशी संवाद साधल्याची माहिती माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिली.माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी व न.प. पदाधिकारी यांनी भाजी मार्केट परिसराला भेट देऊन व्यापारी, आडते व शेतकरी बांधवांशी संवाद साधला. अनेक वर्षांपासून या भाजी मार्केटची इमारत धोकादायक अवस्थेत असून, विशेषतः पावसाळ्यात व्यापारी, शेतकरी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होत असल्याची बाब यावेळी समोर आली. या पार्श्वभूमीवर नगर परिषद, सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात येणार आहे. धोकादायक ठरलेल्या या जुन्या इमारतीच्या पाडकामाची कार्यवाही लवकरच हाती घेण्यात येणार आहे. राज्याचे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे व ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नोव्हेंबर महिन्यापासून नव्या भाजी मार्केटच्या बांधकामास प्रारंभ होणार आहे. नवीन बाजारपेठेमध्ये व्यापाऱ्यांसाठी सुसज्ज गाळे, कॅन्टीन, शेतकरी बांधवांसाठी निवारा शेड, आधुनिक शौचालय व्यवस्था, पाण्याची टाकी, अंतर्गत रस्ते, पथदिवे, संरक्षण भिंत यासह विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. परळी शहराच्या व्यापारी व कृषी अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू असलेल्या या बाजारपेठेला नवसंजीवनी देण्याचा नगर परिषदेचा प्रयत्न असून, व्यापारी, शेतकरी आणि ग्राहकांसाठी सुरक्षित, स्वच्छ व आधुनिक बाजारपेठ उभारण्याचा संकल्प असल्याचे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी स्पष्ट केले. यावेळी न.प. गटनेते वैजनाथ सोळंके, अंगद माळी, नगर अभियंता ढवळे, नगर रचना विभागाचे यम्मलवाड यांच्यासह व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# तानाजी शंकर पवार यांचे निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**शेळगाव । राहुल जाधव**

शेळगाव (ता. इंदापूर) येथील तानाजी शंकर पवार, वय – ६० यांचे निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली,जावई, मुलगा, भाऊ, चार बहिणी, भावजय, पुतणे, नातवंडे असा त्यांचा परिवार आहे. निवृत्त शिक्षक दत्तात्रय पवार यांचे ते बंधू होते तसेच दिलीप व शिंगाडे व लोकमंगल बँकेचे अधिकारी विलास शिंगाडे यांचे ते मामा होते.



## हदगाव तालुक्यात 'जनगणना–२०२७' चा पहिला टप्पा सुरू; तहसीलदार सय्यद उमर यांचे नागरिकांना सहकार्याचे आवाहन


**प्रशासनातर्फे विनंती : प्रगणक घरी आल्यावर त्यांना घाबरुन न जाता विचारलेली माहिती अचूक द्या व प्रशासनाला पूर्ण सहकार्य करा**

लोकनेता न्युज नेटवर्क

**हदगाव । चंद्रकांत भोरे**

भारत सरकारच्या गृह मंत्रालयाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या 'जनगणना २०२७' च्या पहिल्या टप्प्यात दिनांक १६ मे. पासून हदगाव तालुका (ग्रामीण) क्षेत्रात अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. या राष्ट्रीय कार्यात तालुक्यातील सर्व नागरिकांनी नियुक्त प्रगणकांना अचूक माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे, असे जाहीर आवाहन हदगाव चे तहसीलदार तथा चार्ज जनगणना अधिकारी सय्यद उमर यांनी केले आहे.पहिल्या टप्प्यात होणार घरयादी आणि घरगणना : मिळालेल्या माहितीनुसार दिनांक १६ मे. पासून सुरू झालेल्या या पहिल्या टप्प्यांतर्गत हदगाव तालुक्यातील ग्रामीण भागातील प्रत्येक गावामध्ये 'घरयादी' आणि 'घरगणना' करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी प्रशासनाच्या वतीने विशेष प्रगणकांची नियुक्ती करण्यात आली असून, ते प्रत्यक्ष घरोघरी जाऊन माहिती गोळा करणार आहेत.

अचूक माहिती देणे हे देशाच्या विकासासाठी गरजेचे : या संदर्भात बोलताना तहसीलदार सय्यद उमर यांनी सांगितले की, जनगणना हे देशाच्या भवितव्याच्या आणि विकासाच्या योजना आखण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे आपल्या घरी येणाऱ्या



शासकीय प्रगणकांना विचारलेली सर्व माहिती अत्यंत अचूक, योग्य आणि सत्य स्वरूपात द्यावी. नागरिकांचे हे सहकार्य देशाच्या विकासासाठी मोलाचे ठरणार आहे.

अचूक माहिती देणे हे देशाच्या विकासासाठी गरजेचे : या संदर्भात बोलताना तहसीलदार सय्यद उमर यांनी सांगितले की, जनगणना हे देशाच्या भवितव्याच्या आणि विकासाच्या योजना आखण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे आपल्या घरी येणाऱ्या शासकीय प्रगणकांना विचारलेली सर्व माहिती अत्यंत अचूक, योग्य आणि सत्य स्वरूपात द्यावी. नागरिकांचे हे सहकार्य देशाच्या विकासासाठी मोलाचे ठरणार आहे.

# कासार सिरसी–मुदगड रस्त्याची दुरवस्था: खड्ड्यांमुळे अपघातांची मालिका; ग्रामस्थ आणि वाहनधारक संतप्त

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । फिरोज जागीरदार**

निलंगा तालुक्यातील कासार सिरसी येथील कासार सिरसी ते मुदगड या मुख्य रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, रस्त्यावर पडलेल्या महाकाय खड्ड्यांमुळे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे वाहनधारकांसाठी जीवघेणा प्रवास ठरत आहे. प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

**रस्त्याची झाली चाळण; खड्डे की खड्ड्यात रस्ता?**

गेल्या काही महिन्यांपासून कासार सिरसी–मुदगड रस्त्याची उर्दु शाळे समोरील डांबरीकरण पूर्णपणे उखडून गेले आहे. रस्त्यावर ठिकठिकाणी एक ते दीड फुटाचे खोल खड्डे पडले आहेत. वाहनधारकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने रोज लहान–मोठे अपघात घडत आहेत. विशेषतः दुचाकीस्वार या खड्ड्यांमुळे घसरून पडून गंभीर जखमी होण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

**अपघातांची मालिका आणि रात्रीचा धोका**



या मार्गावर पथदिव्यांची सोय नसल्याने रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिकच बिकट होते. रात्रीच्या अंधारात खड्ड्यांचा अंदाज न आल्यामुळे अनेक वाहने पलटी झाली आहेत, तर काहींच्या गाड्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. शाळकरी विद्यार्थी, नोकरदार आणि शेतकरी यांना याच रस्त्यावरून दैनंदिन प्रवास करावा लागत असल्याने त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. एखाद्या मोठ्या आणि जीवघेण्या अपघाताची प्रशासन वाट पाहत आहे का? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत. खड्डे चुकवण्याच्या नादात अनेकदा वाहने समोरासमोर येतात, ज्यामुळे या अरुंद रस्त्यावर तासनतास वाहतूक कोंडी निर्माण होते. एसटी बस, ऑटो आणि मालवाहू गाड्यांचे एक्सेल तुटणे, टायर पंक्चर होणे यांसारख्या समस्यांमुळे वाहनधारक आर्थिक संकटात सापडले आहेत. रुग्णांना घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकांनाही या खड्ड्यांमुळे संथ गतीने जावे लागत असल्याने वेळेवर उपचार मिळण्यात अडथळे येत आहेत.

**प्रशासनाला जाग कधी येणार?**

या रस्त्यावरून जाताना जीव मुठीत घ्यावा लागतो. खड्ड्यांमुळे माझ्या पाठीला आणि कंबरेला त्रास सुरू झाला आहे. अनेकदा दुचाकी घसरून लोक जखमी झालेत. प्रशासनाने याकडे त्वरित लक्ष देऊन रस्त्याची तात्पुरती मलमपट्टी न करता दर्जेदार खडीकरण आणि डांबरीकरण करावे.

**–स्थानिक नागरिक व वाहनधारक**

**ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा**

या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिक ग्रामस्थांनी आणि लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक बांधकाम विभागाला वारंवार कळवले आहेत. परंतु, अधिकाऱ्यांकडून केवळ आश्वासनापलीकडे काहीही मिळालेले नाही. प्रशासनाच्या या उदासीन भूमिकेविरोधात आता कासार सिरसी येथील ग्रामस्थांनी एकत्र येत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. जर आगामी काही दिवसांत रस्त्याची दुरुस्ती सुरू झाली नाही, तर थेट 'रास्ता रोको'आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा पंचक्रोशीतील नागरिकांनी दिला आहे.

# नागरसोगा येथील शेतकऱ्याच्या 'आंबा विवाह' सोहळ्याला आ.अभिमन्यू पवारांची उपस्थिती निसर्गप्रेमाचा संदेश

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**जीवन जाधव । औसा**

हौसेला मोल नसते सध्या लग्नासाठी मुलांना मुली मिळत नाहीत म्हणून मुलांचे पालक परेशान आहेत. पण कुठलेही काम करायचे म्हटले तर त्या कामासाठी हौस लागते. हौस असेल तर त्या हौसेला मोल नसते. असाच एक आगळा वेगळा आणि चारशे ते पाचशे लोकांना भोजनदान देऊन एक आगळा वेगळा आंब्याचा विवाह सोहळा औसा तालुक्यातील नागरसोगा येथे पार पडला आणि या विवाह सोहळ्याला तालुक्याचे आ. अभिमन्यू पवार यांच्यासह अधिकारी कर्मचारी व मान्यवरांनी उपस्थिती लावली.

शेती आणि निसर्गाप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी औसा तालुक्यातील नागरसोगा येथील एका प्रगतशील शेतकऱ्याने आपल्या शेतातील आंबा झाडाचा विवाह सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा केला. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पांतर्गत लावलेल्या या झाडांच्या 'लग्नाला' चक्क आमदार अभिमन्यू पवार यांनी उपस्थिती लावून शेतकऱ्याचा उत्साह द्विगुणित केला.

निसर्गप्रेमाचा आगळावेगळा उपक्रम पाहण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरसोगा येथील निसर्गप्रेमी शेतकरी श्री. पंडित विश्वनाथ जवळगे यांनी सन २०२२-२३ मध्ये कृषी विभागाच्या योजनेतून आंबा फळबाग लागवड केली होती. या झाडांचे जतन एखाद्या लेकराप्रमाणे केल्यानंतर दिनांक १५ मे २०२६ रोजी त्यांनी या आम्र वृक्षाचा शुभ विवाह सोहळा आयोजित केला. विशेष म्हणजे, यासाठी त्यांनी रीतसर निमंत्रण पत्रिकांचे वाटप करून भोजनाची पण व्यवस्था केली होती .

या अनोख्या विवाह सोहळ्याला आमदार अभिमन्यू पवार यांनी विशेष वेळ काढून उपस्थिती लावली. यावेळी बोलताना ते म्हणाले की, शेतकऱ्याने झाडांवर लेकरा सारखं प्रेम करणं ही आपली संस्कृती आहे. शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक क्रांती घडवायची



असेल, तर केवळ पारंपरिक पिकांवर अवलंबून न राहता कमी पाण्याच्या रेशीम शेती आणि केशर आंबा लागवडीसारख्या फळ बागांकडे वळणे काळाची गरज आहे. असे यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी बोलताना सांगितले

औसा तालुका कृषि अधिकारी दत्तात्रय हाके यावेळी बोलताना म्हणाले कि तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकरी यांनी रेशिम शेती व केशर आंबा लागवड करावी ऊस शेती सोडून फळबाग लागवड करावी औसा तालुक्यातील द्राक्ष शेतकरी यांनी जवळपास ५० कोटी रू ची द्राक्षे युरोपियन देशात निर्यात केली असल्याचे सांगितले.

यावेळी सरपंच सौ. सरोजा भास्कर सूर्यवंशी संतोषप्पा मुक्ता उपसरपंच बंडू मसलकर तालुका कृषी अधिकारी दत्तात्रय हाके, मंडळ कृषी अधिकारी आर. डी. रेवशेट्टे, सहाय्यक कृषी अधिकारी श्रीमती एम. एम. घायाळ. ग्रामपंचायत सदस्य भास्कर सूर्यवंशी, दिलीप सूर्यवंशी. सुनील जवळगे, अतुल पाटील, चेअरमन यशवंतराव शिंदे, दिपक चाबुकस्वार यांची उपस्थिती होती.

नागरसोगा गावातील महिला व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. झाडाप्रती असलेल्या या जिव्हाळ्याच्या उपक्रमाचे संपूर्ण तालुक्यात कौतुक होत असून, कृषी विभागाच्या योजनांचा लाभ घेऊन शेतकरी कशाप्रकारे प्रगती करू शकतो, याचे उदाहरणच पंडित जवळगे यांनी शेतकऱ्यां समोर ठेवले आहे.

## दिग्रसमध्ये बुलडोजर कारवाईचा धडाका

# उघड्यावर मास विक्री व अतिक्रमण करणाऱ्यांवर प्रशासनाचा करडा बडगा

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**किशोर की. कांबळे । दिग्रस**


शहरातील रस्त्यावर उघड्यावर मास विक्री करून अतिक्रमण थाटणाऱ्यांविरोधात अखेर प्रशासनाने कडक भूमिका घेत थेट बुलडोजर कारवाई सुरू केली आहे. रविवार, दि. १७ मे २०२६ रोजी नगर परिषद व पोलीस विभागाच्या संयुक्त पथकाने मानोरा चौक व नवीन बस स्थानक परिसरात धडक मोहीम राबवत अतिक्रमण हटविण्यास सुरुवात केली.कारवाईदरम्यान उघड्यावर उभारण्यात आलेली तब्बल ८ अतिक्रमित दुकाने जमीनदोस्त करण्यात आली असून उर्वरित अतिक्रमणांवरही पुढील टप्प्यात कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.रस्त्यावर उघड्यावर



मास विक्रीमुळे अस्वच्छता वाढत असून वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून वारंवार येत होत्या. याची गंभीर दखल घेत नगर परिषद प्रशासन व पोलीस विभागाने संयुक्त मोहीम उघडली आहे. कोणीही सार्वजनिक ठिकाणी अतिक्रमण करू नये तसेच उघड्यावर मास विक्री करू नये, अन्यथा बुलडोजर कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.मुख्याधिकारी विठ्ठल केदारे व सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा प्रभारी अधिकारी डॉ. तेजस सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम सुरू असून आरोग्य विभागाचे धीरज जाधव, इरफान खान, पोलीस उपनिरीक्षक महेश देशमुख, मोरेश्वर राठोड, मिथुन जाधव, गोविंद शेळके, अनिल मदने यांच्यासह नगर परिषद व पोलीस विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने कारवाईत सहभागी झाले होते.

अचानक झालेल्या या धडक कारवाईमुळे अतिक्रमणधारकांमध्ये एकच खळबळ उडाली असून शहरातील इतर अतिक्रमणधारकांनीही धास्ती घेतल्याचे चित्र दिसून येत आहे

# जेएनपीए शाळा प्रकरण: हायकोर्टाच्या दणक्यानंतर प्रशासनाची नरमाई; पण माध्यमांच्या विभाजनामुळे शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**उरण । विठ्ठल ममताबादे**

जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथेरिटी (JNPA) परिसरातील दोन नामांकित शाळा बंद करण्याच्या निर्णयावरून मुंबई उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर अखेर जेएनपीए प्रशासनाने नरमाईची भूमिका घेतली आहे. न्यायालयाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित ठेवतानाच, आता या वादात शिक्षकांच्या नोकरीचा आणि पगाराचा एक नवा गंभीर पेच समोर आला आहे.पुढील सुनावणीपर्यंत शाळा बंद करण्याबाबत किंवा पालकांवर कोणतीही सक्तीची कारवाई करणार नाही, असे आश्वासन प्रशासनाने दिले.शाळेचे व्यवस्थापन स्वीकारण्यास कोणत्या संस्था इच्छुक आहेत, त्यांचे अधिकृत पत्र रेकॉर्डवर आणण्यासाठी प्रशासनाने कोर्टाकडे वेळ मागितला आहे. न्यायमूर्ती रिया छागला आणि अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाने १३ मे नंतर मुलांचे शिक्षण विस्कळीत होऊ नये म्हणून पालकांची विनंती मान्य करत पुढील सुनावणी ११ जून निश्चित केली आहे.न्यायालयीन लढाईत २२०० विद्यार्थ्यांचे भविष्य तूर्तास सुरक्षित झाले असले, तरी शाळा चालवण्यासाठी मराठी आणि इंग्रजी माध्यमासाठी वेगवेगळ्या संस्था आल्यास शिक्षकांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.सध्या मराठी माध्यमाचे काही अनुभवी शिक्षक इंग्रजी माध्यमाच्या वर्गांनाही शिकवत आहेत. संस्था वेगवेगळ्या झाल्यास या शिक्षकांचे समायोजन धोक्यात येईल.

नवीन संस्था आल्यास त्या केवळ आपल्या अखत्यारीतील मान्यता प्राप्त शिक्षकांचाच विचार करतील त्यामुळे जुन्या शिक्षकांच्या पगार आणि सेवाशर्ती रखडण्याची दाट शक्यता आहे. मराठी माध्यम आमचे नाही इंग्रजी माध्यम आमचे नाही अशी भूमिका घे दोन्ही संस्था शिक्षकांकडे दुर्लक्ष करू शकतात ज्यामुळे शिक्षकांना वालीच उरणार नाही. शिक्षकांच्या मते गेल्या ३५ वर्षांपासून दोन्ही माध्यमे एका संस्थेच्या छत्राखाली यशस्वीपणे कार्यरत आहेत त्यामुळे भविष्यातही शाळा कोणत्याही एकाच सक्षम आणि सर्वसमावेशक संस्थेकडे सोपवण्यात यावी. एका संस्थेकडे नियंत्रण राहिल्यास दोन्ही माध्यमातून शिक्षकांचे समन्वय टिकून राहील कोणावरही अन्याय होणार नाही. ११ जून रोजी होणाऱ्या अंतिम सुनावणीत हायकोर्ट विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबतच या शिक्षकांच्या रोजगाराबाबत काही निर्देश देते याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिऊर बंगला येथील भीषण आगीत बाधित व्यावसायिकांना आमदार रमेश पाटील बोरणारे यांची मदतीचा हात.

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

शिऊर बंगला येथे नुकत्याच झालेल्या भीषण आगीत व्यावसायिक हॉटेल, पंचर दुकाने तसेच इतर अनेक दुकानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या आगीत अनेक व्यावसायिकांचे आर्थिक कंबरडे मोडले असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या दुर्घटनेची माहिती मिळताच वैजापूर-गंगापूर तालुक्याचे कार्यसम्राट आमदार प्रा. रमेश पाटील बोरणारे यांनी घटनास्थळी भेट देत नुकसानग्रस्त व्यावसायिकांची प्रत्यक्ष भेट घेतली. त्यांनी बाधितांना वैयक्तिक स्वरूपात अल्प आर्थिक मदत देऊन दिलासा दिला. तसेच शासनाच्या माध्यमातून पंचनामे करून शासकीय मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

आमदार बोरणारे म्हणाले की, या आगीत नुकसान झालेल्या प्रत्येक व्यावसायिकाला शासनाच्या माध्यमातून योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील. संकटाच्या काळात आपण सर्वांनी एकत्र राहून बाधितांना आधार देणे गरजेचे आहे. यावेळी परिसरातील प्रमुख लोकप्रतिनिधी, विविध पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्थानिक प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, बाधित व्यावसायिकांना लवकरात लवकर मदत मिळावी अशी मागणी करण्यात येत आहे.

या मदतीमुळे आगीत सर्वस्व गमावलेल्या व्यावसायिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला असून, आमदार बोरणारे यांच्या पुढाकाराचे परिसरातून स्वागत करण्यात येत आहे.



# नोकऱ्या नाहीत,विकास नाही; फक्त जात-धर्माच्या नावावर राजकारण-भोकरदनमध्ये संताप!

## भोकरदन मतदारसंघात 'तिसऱ्या पर्याया'ची मागणी तीव्र होत आहे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**भोकरदन । ज्ञानेश्वर जगताप**

आम आदमी पार्टि भोकरदन मतदारसंघात सलग वर्षानुवर्षे सत्तेत राहुनही स्थानिक बेरोजगार तरुणांना नोकऱ्या मिळवून देण्यात प्रस्थापित नेते अपयशी ठरल्याचा आरोप नागरिक करत आहेत. विकास कामांऐवजी जात-धर्माच्या नावावर वाद लावून सत्ता हस्तगत करण्याचेच मनसुबे प्रस्थापित पक्षांचे असल्याचे जनतेच्या निदर्शनास आले आहे.

१ ) सत्ता होती, पण नोकऱ्या दिल्या नाहीत.

मतदारसंघात आमदार, खासदार, जि.प., पं.स. अशा सर्व महत्त्वाच्या पदांवर प्रस्थापितांचीच सत्ता आहे. तरीही तालुक्यातील हजारो सुशिक्षित तरुण बेरोजगार फिरत आहेत. पद असूनही आमच्या पोरांना साधी शिपायाची नोकरी मिळवून दिली नाही. मंत्रालयात वजन वापरून एकही मोठा उद्योग, चखऊ किंवा सरकारी भरती आणली नाही, अशी खंत स्थानिक तरुण व्यक्त करत आहेत.

२) नुकतीच नगरपरिषद निवडणुकीत प्रचिती

नुकत्याच झालेल्या भोकरदन नगरपरिषद निवडणुकीत पुढाऱ्यांनी जात-धर्माच्या मुद्द्यांना हवा देऊन समाजात



तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला, असा अनुभव नागरिकांनी कथन केला. विकासाच्या मुद्द्यांवर बोलायचे सोडून फक्त जाती-धर्मात भांडणे लावून मते मिळवण्याचे राजकारण केले जाते. प्रस्थापित पक्षांचे एकमेव ध्येय सत्ता हस्तगत करणे हेच आहे, असा आरोप नागरिक करत आहेत.

३ ) शेती,कष्टाळु शेतकरी आहेत, कारखाने नाहीत

तालुक्यात कापूस, मिरची,अद्रक, तूर, सोयाबीनचे विक्रमी उत्पादन होते. मात्र, शेतीमालावर प्रक्रिया करणारा एकही सहकारी कारखाना आजतागायत उभारला गेलेला नाही. कै. रंगनाथ पाटील यांचा सहकारी साखर कारखानाही मुद्दाम तोट्यात दाखवुन सरकारी अनुदान मिळवतात. कर्मचार्यांना आर्थिक मानसिक त्रास देतात.कारखाने असते तर हजारो हातांना काम मिळाले असते, पण इच्छा शक्तीच नव्हती, असे नागरिकांचे म्हणणे आहे.

४ ) पैसा फेको, तमाशा देखो' राजकारण

निवडणुकीत पाण्यासारखा पैसा उधळून, रात्री-अपरात्री घरोघरी जाऊन नाक घासुन,पाय धरुन मतदारांना आमिषे दाखवली जातात. निवडून आल्यावर मात्र पुढारी जनतेला व शिक्षित बेरोजगारांना विसरतात. एक सापनाथ तर दुसरा नागनाथ अशी स्थिती आहे, अशी खंत व्यक्त होत आहे.

५ ) प्रशासनावर 'वजन', योजनांचा बोजवारा

सरकारी कार्यालयात पात्रता नसलेले शिफारशीचे पुढार्यांच्या पुढे उठबशा काढणारे अधिकारी आणले जातात.यांच्या माध्यमातुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करता येतो. सरकारी योजनांचा लाभ गरजू गरीबांऐवजी पुढाऱ्यांच्या जवळच्या अपात्र धनदांडग्या श्रीमंत लोकांनाच मिळतो. रोजगार हमी, कौशल्य विकास योजनांचा बट्ट्याबोळ झाला आहे.

६ ) संघर्ष समिती' स्थापन करण्याची मागणी

जनता एकदा बदलली की मोठे पैसेवालेही काही करू शकत नाहीत. दगडाला देव करण्याची जनतेची तयारी दिसुन येत आहे.आता जात-धर्माच्या राजकारणाला कंटाळलेली जनता याला बळी न पडता विकासाच्या मुद्द्यावर सर्वांनी एकत्र यावे, असे आवाहन करत आहे. शेतीमाल प्रक्रिया उद्योग, चखऊ, भरती मेळावे आणल्याशिवाय बेरोजगारी हटणार नाही. त्यासाठी नवीन, स्वच्छ नेतृत्व हवे, अशी मागणी जोर धरत आहे.

**नागरिकांचे प्रमुख आरोप**

**१. पदे असूनही बेरोजगारांना नोकऱ्या दिल्या नाहीत**
**२. जात-धर्माच्या नावावर वाद लावून सतत सत्ता मिळवण्याचा प्रयत्न**
**३. शेतीमाल प्रक्रिया उद्योग नाही**
**४. योजनांचा लाभ श्रीमंतांना**
**५. निकृष्ट दर्जाची रस्त्यांची कामे**
**६. संघर्ष समिती पर्याय**

**-बोरशे गुरुजी**
**आम आदमी पार्टि**
**९४०३५००४७७**

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933